# समर्थन

## खर्चाचे पूरक विवरणपत्र विश्लेषण

### विभाग निहाय

## मार्च, २०१८

### वर्ष २०१७-१८

### (महाराष्ट्र राज्य)

**समर्थन**
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटलजवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मरिन लाईन्स (पू),मुंबई-४०० ०२०
दूरध्वनी क्र.: ०२२-२२००३०६०
**विश्लेषक : रुपेश किर : ९८९२९३९६१७**
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# अर्थसंकल्पीय अधिवेशन - मार्च, २०१८

## खर्चाचे पूरक विवरणपत्र २०१७-१८

**ठळक वैशिष्टे:**

- मार्च, २०१८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वर्ष २०१७-१८साठी रु. ३ हजार ८७१ कोटी २९ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत. मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत हे प्रमाण १.२८% आहे.

- डिसेंबर, २०१७ च्या नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात रु. २६ हजार ४०२ कोटी ३२ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या होत्या. मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत हे प्रमाण ८.७८% होते. सदर पुरवणी मागण्यांपैकी प्रत्यक्षात निव्वळ आर्थिक भार हा रु. २१ हजार ९९४ कोटी इतका आहे. म्हणजे ही रक्कम सरकारला कर्ज काढून उभी करावी लागणार आहे किंवा इतर विभागांचा निधी या पुरवणी मागण्यांसाठी वळवावा लागणार आहे.

- जुलै, २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात एकूण रु. ३३ हजार ५३३ कोटी ८५ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या होत्या. मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पूरक मागणीचे प्रमाण ११.१६% होते.

- मार्च, २०१७ चा मूळ अर्थसंकल्प (मूळ मागणी) रु. ३ लाख ३९७ कोटींचा असून जुलै, डिसेंबर-२०१७ व मार्च २०१८ च्या पुरवणी मागण्या रु. ६३ हजार ८०७ कोटी ४६ लाखांच्या आहेत. मूळ मागणीत या पुरवणी मागणीचे प्रमाण आता २१.२४% झाले आहे.

- मार्च, २०१७ मध्ये शासनाने सादर केलेला अर्थसंकल्प (मूळ मागणी) रु. ३ लाख ३९७ कोटींचा होता. जुलै-डिसेंबर २०१७ व मार्च, २०१८ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून एकूण अर्थसंकल्प रु. ३ लाख ६४ हजार २०५ कोटी १२ लाखांचा झाला.

- शेतकरी कर्जमाफीसाठी 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७' अंतर्गत जुलै-डिसेंबर १७ च्या दोन्ही अधिवेशनात मिळून पुरवणी मागणीद्वारे (रु. ३५,००० कोटी) रुपये

उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ही रक्कम एकूण (रु. ६३,८०७.४६ कोटी) पुरवणी मागण्यांमध्ये ५४.८५% आहे.

- आकस्मिकता निधीतून जुलै-डिसेंबर व मार्च,२०१८ या तीन अधिवेशनात मिळून वर्षभरात आकस्मिकता निधीतून रु. १८९ कोटी २ लाख काढण्यात आले आहेत.
- डिसेंबर पुरवणी मागण्यांमध्ये एकूण १४ विभागांच्या २१ मागण्या असून त्यात ३५ बाबी अंतर्भूत आहेत.
- मार्च, २०१८ मध्ये रु. ३ हजार ८७१ कोटी २९ लाखांच्या पूरक मागण्या सादर केलेल्या १४ विभागांपैकी १) वित्त, २) उच्च व तंत्र शिक्षण, ३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण तसेच ४) महिला व बाल विकास या ४ विभागांनी सर्वात जास्त रु. ३ हजार ८३४ कोटी ५१ लाखांच्या पूरक मागण्या सादर केल्या आहेत. एकूण पूरक मागणीत हे प्रमाण ९९.०४% आहे.
- वित्त विभागाने रु. ३ हजार ९५ कोटी ५९ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या असून एकूण पुरवणी मागण्यांमध्ये हे प्रमाण ८०% आहे.
- वर्ष २०१७-१८ च्या जुलै, डिसेंबर व मार्च, २०१८ मध्ये एकूण रु. ६३ हजार ८०७ कोटी ४६ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या असून त्यापैकी आकस्मिकता निधीतून रु. १८९ कोटी २ लाखांची रक्कम काढण्यात आली असून तीन्ही अधिवेशनात आकस्मिकता निधीचा गैरवापर केला आहे.
- सर्वात गंभीर बाब म्हणजे मराठा समाजाच्या सर्वेक्षणासाठी आणि प्रशासकीय खर्चासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून, सामाजिक न्याय-अनुसूचित जातीचे कल्याण या शीर्षांतर्गत आकस्मिकता निधीची भरपाई करण्यासाठी १ कोटींची रक्कम काढण्यात आली आहे. त्यामुळे येथे अर्थसंकल्पीय नियमांचा सर्रास भंग झाल्याचे दिसून येते.

## मार्च, २०१८ च्या महसुली व भांडवली पुरवणी मागण्या

तक्ता क्र. १ *(रु. कोटीत)*

| मागण्यांचा प्रकार | भारित | दत्तमत | एकूण |
|---|---|---|---|
| महसुली | २,१३०.७३ | ७७४.५५ | २,९०५.२९ |
| भांडवली | ९६६.०० | ०.०० | ९६६.०० |
| **एकूण** | **३,०९६.७३** | **७७४.५५** | **३,८७१.२९** |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, मार्च, २०१८*

- मार्च, २०१८ मध्ये वर्ष २०१७-१८ साठी रु. ३ हजार ८७१ कोटी २९ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत, यामध्ये दत्तमत स्वरुपाच्या रु. ७७४ कोटी ५५ (२०%) लाखांच्या पुरवणी मागण्या आहेत. तर भारित स्वरुपाच्या रु. ३ हजार ९६ कोटी (८०%) लाखांच्या पुरवणी मागण्यांचा समावेश आहे.

## मूळ मागणीच्या तुलनेत मार्च पुरवणी मागणीचे प्रमाण १.२८ टक्के तर एकूण पुरवणी मागणीचे प्रमाण २१.२४ टक्के

तक्ता क्र. २ *(रुपये कोटीत)*

| मागणी | रक्कम | मूळ मागणीशी प्रमाण | एकूण मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|
| मार्च, २०१७ मूळ मागणी | ३,००,३९७.६६ | १००.००% | ८२.४८% |
| जुलै, २०१७ पूरक मागणी | ३३,५३३.८५ | ११.१६% | ९.२१% |
| डिसेंबर, २०१७ पूरक मागणी | २६,४०२.३२ | ८.७९% | ७.२५% |
| मार्च, २०१८ पूरक मागणी | ३,८७१.२९ | १.२९% | १.०६% |
| **एकूण मागणी** | **३,६४,२०५.१२** | **१२१.२४%** | **१००.००%** |

*स्त्रोत: वित्त विषयक विवरण पत्र २०१७-१८ व खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै-डिसेंबर २०१७ व मार्च-२०१८*

- राज्याचा एकूण अर्थसंकल्प (मूळ मागणी) रु. ३ लाख ३९७ कोटी एवढा होता. जुलै, डिसेंबर - २०१७ व मार्च, २०१८ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून एकूण अर्थसंकल्प रु. ३ लाख ६४ हजार २०५ कोटी १२ लाखांचा झाला आहे. याचाच अर्थ या अर्थसंकल्पामध्ये २१% वाढ झाली आहे.

# सर्वाधिक पुरवणी मागण्या केलेले विभाग

तक्ता क्र. ३ (रु. कोटीत)

| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मूळ मागणी | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| वित्त | २ | ३,०९५.५९ | ६९,२८८.७० | ४.४६% |
| उच्च व तंत्र शिक्षण | १ | ४२९.९१ | ७,४९७.८८ | ५.७३% |
| अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | १ | १८८.२८ | ५,९१८.६९ | ३.१८% |
| महिला व बाल विकास | १ | १२०.७१ | २,३१८.११ | ५.२१% |
| ४ | ५ | ३,८३४.५१ | ८५,०२३.३८ | ४.५०% |

*स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, मार्च, २०१८ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज-भाग - २*

- **मार्च, २०१८ चे खर्चाचे पूरक विवरणपत्र मध्ये रु. ३ हजार ८७१ कोटी २९ लाखांच्या पूरक मागण्या सादर करण्यात आले. या विवरणपत्रात १४ विभागांचा समावेश होता. त्यापैकी १) वित्त, २) उच्च व तंत्र शिक्षण, ३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण तसेच ४) महिला व बाल विकास विभाग यांनी १०० कोटींपेक्षा जास्त रकमेच्या पुरवणी मागण्या केल्या असून एकूण पुरवणी मागणीमध्ये या ४ विभागांचे प्रमाण रु. ३ हजार ८३४ कोटी (९९.०४%) आहे.**
- **वित्त विभागाने सर्वाधिक रु. ३ हजार ९५ कोटी ५९ लाखांची पुरवणी मागणी केली असून एकूण पुरवणी मागणीत त्याचे प्रमाण ८०% टक्के आहे.**

## आकस्मिकता निधीतून काढलेली रक्कम १८९ कोटी २ लाख (वर्ष २०१७-१८)

तक्ता. क्र. ४ (रु. कोटीत)

| अधिवेशन | विभाग | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| **जुलै, २०१७** | सहकार पणन व वस्त्रोद्योग | कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य | ४३.४८ |
| | विधि व न्याय | हिंगणवार, जिल्हा वर्धा येथे जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय स्थापन करणे. | ०१.१३ |
| **डिसेंबर, २०१७** | सहकार पणन व वस्त्रोद्योग | सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य | १०८.६४ |
| | | 'भीमा सहकारी साखर कारखाना', दौंड, पुणे यांना खेळते भांडवलासाठी कर्ज सहाय्य. | ३५.९० |
| **मार्च, २०१८** | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | मराठा समाजाच्या सर्वेक्षणासाठी आणि प्रशासकीय खर्चासाठी तरतूद | ०१.०० |
| | | **एकूण** | **१८९.०२** |

*स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै-डिसेंबर -२०१७ व मार्च, २०१८*

- वर्ष २०१७-१८ च्या जुलै, डिसेंबर व मार्च, २०१८ मध्ये एकूण रु. ६३ हजार ८०७ कोटी ४६ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या असून त्यापैकी आकस्मिकता निधीतून रु. १८९ कोटी २ लाखांची रक्कम काढण्यात आली असून तीन्ही अधिवेशनात आकस्मिकता निधीचा गैरवापर केला आहे.
- सर्वात गंभीर बाब म्हणजे मराठा समाजाच्या सर्वेक्षणासाठी आणि प्रशासकीय खर्चासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून, सामाजिक न्याय-अनुसूचित जातीचे कल्याण या शीर्षांतर्गत आकस्मिकता निधीची भरपाई करण्यासाठी १ कोटींची रक्कम काढण्यात आली आहे. त्यामुळे येथे अर्थसंकल्पीय नियमांचा सर्रास भंग झाल्याचे दिसून येते.

## आकस्मिकता निधीसंबंधी अंदाज समितीची शिफारस

अकल्पित व तातडीचा खर्च भागविण्यासाठी आकस्मिकता निधीतून घेतलेल्या आगाऊ रकमेची भरपाई करावयाची यासाठी पुरवणी मागणी करता येते.

''अतिरिक्त खर्च समायोजित करण्यासाठी शासनाकडून आकस्मिकता निधीची मूळ मर्यादा तात्पुरत्या स्वरुपात बऱ्याचदा वाढविण्यात येते. पुष्कळदा असा खर्च सत्ताधारी पक्षाच्या राजकीय गरजा व अत्यावश्यक गोष्टी भागविण्यासाठी केला जातो. त्यामुळे विधानमंडळाचे प्राधिकार धोक्यात येतात...'' गोडबोले समितीच्या या मताशी सहमती दर्शवित अंदाज समितीने पुढील शिफारस केली. ''आकस्मिकता निधीतून रक्कम काढण्यासंबंधी एक नियमावली तयार करण्यात यावी व त्यात कोणत्या परिस्थितीमध्ये व कोणत्या प्रकाराअंतर्गत किती रक्कम काढण्यात येईल याबाबत विशिष्ट असे निकष घालून द्यावेत जेणेकरून या फंडाचा गैरवापर टाळता येईल.'' परंतु अजूनपर्यंत अशा प्रकारची नियमावली राज्य शासनाने तयार केलेली नाही.

*स्त्रोत – अंदाज समितीचा अहवाल, २००१*

# ३ हजार ९५ कोटी ६३ लाखांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर होणार!

## दोन दिवसात केवळ रु. ७७५ कोटी ६६ लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा!

तक्ता. क्र. ५ *(रु. कोटीत)*

| चर्चा होणारे विभाग | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मूळ मागणी | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी % |
|---|---|---|---|---|
| **५ मार्च, २०१८** | | | | |
| गृह | २ | १.१४ | १७,००७.०२ | ०.०० |
| महसूल व वन | २ | १४.३५ | १२,३४५.०० | ०.११ |
| कृषि, पदुम | ३ | २१.२७ | ८,००४.६२ | ०.२६ |
| सार्वजनिक बांधका | २ | ०.०० | १४,५०२.६१ | ०.०० |
| ग्रामविकास व जलसंधारण | १ | ०.०० | १७,६८५.४४ | ०.०० |
| **६ मार्च, २०१८** | | | | |
| अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सं. | १ | १८८.२८ | ५,९१८.६९ | ३.१८ |
| सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | १ | ०.०० | १२,८७६.८६ | ०.०० |
| आदिवासी विकास | २ | ०.०० | ८,८१७.२८ | ०.०० |
| उच्च व तंत्र शिक्षण | १ | ४२९.९१ | ७,४९७.८८ | ५.७३ |
| महिला व बाल विकास | १ | १२०.७१ | २,३१८.११ | ०.०० |
| **एकूण** | **१६** | **७७५.६६** | **१०६९७३.५१** | **०.७२** |
| **विनाचर्चा मंजूर होणाऱ्या मागण्या** | **५** | **३०९५.६३** | | |

*स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, मार्च, २०१८ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज - भाग - २*

- १) गृह, २) महसूल व वन, ३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय, ४) सार्वजनिक बांधकाम, ५) ग्रामविकास व जलसंधारण या विभागांवर सोमवार दि. ५ मार्च, २०१८ रोजी चर्चा होईल तर ६) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, ७) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, ८) आदिवासी विकास, ९) उच्च व तंत्र शिक्षण तसेच १०) महिला व बाल विकास या विभागांवर दि. ६ मार्च, २०१८ रोजी चर्चा होणार आहे.
- राज्य शासनाने वित्त विभागांतर्गत बाजारपेठेतून घेतलेल्या कर्जावरील व्याज, भारतीय रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या कर्जाची परतफेड तसेच रि-इश्यू केलेल्या कर्जरोख्याच्या व्याज प्रदानावरील खर्च भागविण्यासाठी (रु. ३०९५.५९ कोटी) भारित स्वरुपाची पुरवणी मागणी केली आहे. त्यामुळे या मागणीवर सभागृहात चर्चाच होणार नाही. तसेच सामान्य प्रशासन, विधि व न्याय तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता या विभागांच्या मागण्यांवर चर्चा होणार नसून एकूण पुरवणी मागणीत ही रक्कम (८०%) आहे. त्यामुळे केवळ रु. ७७५.६६ (२०%) मागण्यांवर सभागृहात चर्चा होणार आहे.

# फडणवीस सरकारच्या पुरवणी मागण्या पोहोचल्या १ लाख ४४ हजार ६४० कोटींवर

## मार्च, २०१८ च्या अधिवेशनात सादर केल्या ३ हजार ८७१ कोटींच्या पुरवणी मागण्या

*आलेख* *(रु. कोटीत)*




*स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र- डिसेंबर, २०१४ ते मार्च, २०१८*

- युती शासनाने सत्तेवर आल्यापासून म्हणजे डिसेंबर, २०१४ पासून मार्च, २०१८ पर्यंत ११ वेळा पुरवणी मागण्या सादर केल्या. या सर्व पुरवणी मागण्यांची एकूण रक्कम रु. १ लाख ४४ हजार ६४० कोटी ९ लाख आहे.
- हेच शासन विरोधी बाकांवर असताना तात्कालीन आघाडी शासनाला वाढत्या पुरवणी मागण्यांबाबत, राज्यावरील वाढत्या कर्जाबाबत, राज्यातील आर्थिक बेशिस्तीबाबत सतत ओरडत होते. मात्र स्वत: सत्तेवर आल्यानंतर विक्रमी पुरवणी मागण्या करीत आहे, हे पाहता राज्याचे आर्थिक नियोजन डळमळले आहे.
- मार्च, २०१५ व मार्च, २०१६ व आता मार्च, २०१८ वगळता प्रत्येक अधिवेशनात पूरक मागण्यांसाठी ८ हजार ते ३३ हजार कोटी रुपयांची रक्कम काढण्यात आली आहे.
- जुलै, २०१७ मध्ये ३३ हजार ५३३ कोटी रक्कम काढण्यात आली आहे. ही रक्कम युती शासनाने नोव्हेंबर, २०१४ ते मार्च, २०१८ या कालावधीत सादर केलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये सर्वात विक्रमी पुरवणी मागणी ठरली आहे.

## पुरवणी मागण्यांवरील चर्चेसंदर्भात अंदाज समितीचे मत:

''विधानमंडळात पूरक मागण्यांवर फक्त २ दिवस चर्चेला असतात. या २ दिवसात फक्त ८ ते १० विभागांची चर्चा होते. सर्व काम सुरळीत चालल्यास चर्चेसाठी ६ तास उपलब्ध होतात. त्यामध्येच खात्यांच्या मंत्र्यांच्या उत्तराची वेळ समाविष्ट आहे म्हणजे साधारणत: ६ तास एकूण २८९ सदस्यांना उपलब्ध असतात व ही वेळ बऱ्याचदा सदस्यांना अपुरी पडते. त्यामुळे बहुतेकदा चर्चा न करता विधानमंडळांकडून पूरक मागण्या मंजूर केल्या जातात ही वस्तुस्थिती आहे''. बहुतांश पुरवणी मागण्या या खर्चाला औपचारिक मंजुरी मिळविण्यासाठी केलेल्या असतात. याचा अर्थ अर्थसंकल्पाला मंजुरी देताना विधिमंडळ ज्या खर्चांना मान्यता देते त्यासाठी रक्कम उपलब्ध न होता राजकीय हितासाठी केलेल्या पुरवणी मागण्यांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. असे असेल तर नियोजन, अर्थसंकल्प मंजुरी प्रक्रिया या औपचारिकता ठरतात. विधिमंडळाच्या 'अर्थसंकल्प मंजूर करण्याच्या अधिकारा'चा तो संकोच आहे. चर्चेशिवाय संमत होणाऱ्या पुरवणी मागण्या ही एक शासनाच्या अर्थसंकल्पातील गंभीर बाब असून त्यावर विरोधी पक्षाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. कारण याच कारणाने शासनाचा पुरवणी मागण्यांबाबतचा गैरव्यवहार वाढत चालला आहे. म्हणून पुरवणी मागण्यांवर चर्चा होण्याकरिता काही ना काही तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे.